# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. ३९७/२०१९ दिनांक १५/११/२०१९**

**पोलीस अधीक्षक कार्यालयात "शहिद बिरसा मुंडा " यांची जयंती साजरी.**

दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी **" शहिद बिरसा मुंडा "** यांची जयंती पोलीस अधीक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली आहे. **मा. श्री. जहारवाल साहेब ,** पोलीस उप-अधिक्षक(मु.) नांदेड, यांनी पुष्पहार घालुन अभिवादन केले आहे. या प्रसंगी पोनि श्री. प्रशांत देशपांडे, जिवीशा नांदेड, पोनि/जरगर, बिनतारी संदेश, सपोनि/श्री विश्वंभर पल्लेवाड, पोउपनि श्री पंतोजी, जिवीशा , तसेच जिवीशा, स्थागुशा, संगणक शाखा, बिनतारी संदेश शाखा, सी.सी.टी. एन. एस. नियंत्रण कक्ष येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी व सर्व कार्यालयीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते व जनसंपर्क कार्यालयाचे पोहेकॉ/सुर्यभान कागणे, मपोकॉ/सुप्रिया सगर हजर होते.

पोलीस अधिकक्षक कार्यालय,
नांदेड.

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. ३९८/२०१९ दिनांक १५/११/२०१९**

**दिनांक १४ ते २० नोव्हेंबर, २०१९ बालकांचे हक्क व सुरक्षितता सप्ताह बाबत.**

दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ चे १५.०० ते १८.०० वा. चे दरम्यान, नांदेड पोलीस दलाचे वतीने. **मा. श्री. विजयकुमार मगर,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली बालकांचे हक्क व सुरक्षितता सप्ताहाच्या निमित्ताने आज रोजी गुजराती हायस्कुल नांदेड येथे, पोउपनि सविता खर्जुले, यांनी बालकांचे हक्क व सुरक्षा संबधाने योग्य ती माहीती दिली व तेथील महिला शिक्षका यांच्याशी महिलांच्या व मुलींच्या अडचणी संबधाने संवाद केला आहे. तसेच श्रीमती वृषाली जोगदंड यांनी तायक्वॉंदो स्पर्धे बाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करुन दाखविले आहे. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोहेकॉ/संजय जोशी यांनी केले आहे. सदर कार्यक्रमा करीता १५०० ते १६०० विद्यार्थी हजर होते. पोउपनि सविता खर्जुले, पोहेकॉ/संजय जोशी, मपोशि/क्रांती बंदखडके यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले आहे.

पोलीस अधिकक्षक कार्यालय,
नांदेड.